# ज. ए.इ. ची सी. एम्. पुराणिक पूर्व प्राथमिक शाळा, सुभेदारवाडा कल्याण (प.)

## वार्षिक अहवाल नोव्हेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२

सस्नेह नमस्कार,
जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट ची सी.एम. पुराणिक पूर्व प्राथमिक शाळा,सुभेदारवाडा गांधी चौक कल्याण (प).
आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

नोव्हेंबर १९८४ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूटची पूर्व प्राथमिक शाळा सुभेदारवाडयात सुरु झाली.

*पूर्व प्राथमिक/ प्राथमिक विभागाचा पाया रोवणारे सी. एम पुराणिक सर यांना १२ एप्रिल २०२१ रोजी देवज्ञा झाली. सुभेदारवाडयाचे पितामह व तन मन, धनाने शाळेला वाहून घेणारे संस्थेच्या , शाळेच्या व शिक्षकांच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असणारे आदरणीय गुरुवर्य कै. सी. एम पुराणिक सर यांचे नाव शाळेला देण्याचा निर्णय संस्थेने घेतला. सी.एम.पुराणिक संराच्या स्मरणार्थ शाळेचा नामकरण विधी करण्याचे ठरले. व १४ नोव्हेंबर हा दिवस सरांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून मोठया दिमाखात शाळेचा नामकरण समारंभ करण्यात आला. व शाळेला ज.ए.इ.ची सी.एम. पुराणिक पूर्व प्राथमिक शाळा असे नाव देऊन त्यांचा सन्मान केला गेला. यापुढे ही १४ नोव्हेंबर हा दिवस सरांच्या स्मरणार्थ विदयार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा घेऊन साजरा केला जाईल असे सांगण्यात आले.

*कोविड १९च्या काळात 'मायक्रोसॉफ्ट टीम' या अँपद्वारे शाळा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. त्यात विविध सण, उपक्रम स्पर्धा, पाठ यांचे उत्तम नियोजन करण्यान आले व हे शिक्षण यशस्वी पद्धतीने घेण्यात आले.

*शाळा फुगे, रांगोळी पताका यांनी सजवून विद्यार्थ्यांचे औक्षण करून उत्साहाने बुधवार दि. २ फेब्रुवारी २०२२ पासून छोटा शिशु व मोठा शिशु वर्गाची आणि शुक्रवार दि.१८ फेब्रुवारी २०२२ नर्सरी वर्गाची ऑफलाईन शाळा सुरु करण्यात आली.

*शाळेत गरीब विदयार्थ्यांची फी भरण्यासाठी ”स्टुडन्ट वेलफेअर फंड” उघडण्यात आलेला आहे. त्यामुळे समाजातील दानशूर व्यक्तीकडून निधीची अपेक्षा व्यक्त केली जाते.

*१ एप्रिल २०२२ रोजी 'करुणा वृक्ष फाउंडेशन' च्या सदस्या माजी विद्यार्थिनी मा.श्रीम. राजश्री भावे यांनी शाळेतील गरजू विद्यार्थ्यांची फी भरली.

*दि. मार्च १५ मार्च २०२२ ते ०८ एप्रिल २०२२ दरम्यान विदयार्थ्यांच्या तोंडी व लेखी परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आल्या.

*नवीन शैक्षणिक वर्षात व शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागात मोठा शिशु ४ वर्ग, छोटा शिशु ४ वर्ग आणि नर्सरीचे 3 वर्ग असून एकूण ५१८ विद्यार्थी हसत खेळत शिक्षण घेत आहेत.

*आपल्या विभागात कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विदयार्थी पट
संख्या खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| मुख्याध्यापक | ०१ |
| शिक्षक | १२ |
| संगीत शिक्षिका | ०१ |
| लिपिक | ०१ |
| सेविका | ०८ |
| सफाई कामगार | ०१ |
| एकूण | २४ |

| इयत्ता | मुलगे | मुली | एकूण |
|---|---|---|---|
| नर्सरी | ३५ | ४५ | ८० |
| छोटा शिशु | ११७ | ११४ | २३१ |
| मोठा शिशु | ११३ | ९४ | २०७ |
| एकूण | २६५ | २५३ | ५१८ |

*२५ जून २०२२ रोजी माजी. विदयार्थी मा.श्री अनंत गोपाळ जोशी यांच्या हस्ते आधुनिक वातानुकुलीत संगणक कक्षाचे उद्‌घाटन करण्यात आले. मा.श्री. जोशी सरांनी संगणक कक्षासाठी सढळ हस्ते देणगी दिली. या संगणक कक्षाचा उपयोग मोठया शिशुच्या विद्यार्थासाठी होतो.

*विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेसाठी, CCTV कॅमेरा बसविण्यात आले आहे. तसेच पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर फिल्टर बसविण्यात आले आहे. हवेशीर वर्गखोल्या विदयार्थ्यांना खेळण्यासाठी प्रशस्त मैदान आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने शाळेच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाते.

*काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी स्मार्ट बोर्डचा उपयोग करण्यात येतो. शैक्षणिक साधने, विद्यार्थ्यांसाठी खेळणी घर उपलब्ध आहे. ह्या सर्व सुविधांचा लाभ विद्यार्थी घेत आहे.

*मोठ्या शिशु वर्गासाठी आठवडयातून एक दिवस (तोंडी) संस्कृत विषय शिकवला जातो.संस्कृत विषय घेण्याचे मुख्य कारण म्हणजे मुलांचे शब्दोच्चार स्पष्ट अस्खलित व्हावेत. त्यांना पाठातरांची सवय लागावी. हा विषय शिकविण्यासाठी संस्कृत विषयांवर प्रभुत्व असणाऱ्या शिक्षिकेची नेमणूक केली आहे.

*शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यावर चांगले संस्कार व्हावे म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. उदा. दिंडी, दीपपूजा, रक्षाबंधन, बैलपोळा दहीहंडी, भोंडला, संक्रांत, शेकोटी, दसरा, मातृदिन, योगदिन, रंगपंचमी,होळी इ.तसेच दर चार महिन्यांनी विद्यार्थ्यांचे सामुहिक वाढदिवस साजरे केले जातात.

*नवीन शैक्षणिक वर्षातील पहिली 'पालक सभा' माहे जुलै मध्ये घेण्यात आली.

*१ ऑगस्ट लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त विविध स्पर्धा  घेण्यात आल्या.

*नर्सरी -बेडूक उड्या
प्रथम क्रमांक- कु.पाटील नीरज जगदीश

द्वितिय क्रमांक- कु.पाटील ओम  हरिष

तृतीय क्रमांक- कु.बाविस्कर शिवांश विशाल

*छोटा शिशु - सांगितलेली वस्तू  आणणे
प्रथम क्रमांक- कु.पाटील वंश जतीन

द्वितिय क्रमांक- कु.शेख आयान अनिस

तृतीय क्रमांक- कु.निकम आरोही राहुल

उत्तेजनार्थ- कु.पाटील दक्ष मोहन

*मोठा शिशु - वही डोक्यावर घेऊन चालणे
प्रथम क्रमांक- कु.शेख आयान नदीम

द्वितिय क्रमांक- कु.गायकवाड परी रॉबिन

तृतीय क्रमांक- कु.सकपाळ प्रतीक प्रशांत

उत्तेजनार्थ- कु.टाकळकर रुद्र राजेंद्र

*गुरुवार दि. ४ ऑगस्ट २०२२ रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त बाल आधार व सुकन्या समृद्धी योजना (० ते ५ वयोगट ) विदयार्थ्यांसाठी पोस्टातील अधिकारी मा. श्री संदीप जाधव व श्री अशोक सोनवणे यांनी पालकांनी माहिती दिली.

*रविवार दि. १४ ऑगस्ट २०२२ रोजी शाळेच्या प्रांगणात सुभेदारवाडा  संकुलातील  विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम विदयार्थ्यांची रॅली काढण्यात आली.

*बुधवार दि.७ सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षक दिनानिमित्त पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील शिक्षिकांचा गौरव करण्यात आला.शिक्षिकांची स्पर्धा घेण्यात आली.त्यात पारितोषिक प्राप्त शिक्षिकांची नावे पुढीलप्रमाणे

स्पर्धेचे नाव- संगीत खुर्ची.

१.प्रथम क्रमांक-श्रीम.नेहा विजय मोकाशी

२.द्वितिय क्रमांक-श्रीम.वैशाली विवेकानंद देवळे

३.तृतीय क्रमांक-श्रीम.सुवर्णा मनोज जोशी

*श्री व सौ म्हस्के यांनी 'शारदोत्सव' निमित्त भेट म्हणून मखर दिले.रविवार दि. ०२ ऑक्टोबर २०२२ रोजी शारदोस्तव निमित्त माननीय मुख्या. सौ नीलिमा नरेश भाभे यांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले.

*मोठा शिशु गट क्रमांक २ मधील कु.दूर्वा रितेश घोणे विदयार्थिनीच्या पालकांनी शारदोत्सवासाठी सरस्वतीची मूर्ती दिली होती.तसेच गोपाळकाला निमित्त 'दहीहंडी 'भेट दिली होती.

*कु. मानस दत्तराम शेवाळे या विद्यार्थ्याच्या पालकांनी शाळेला औक्षणाचे तबक भेट दिले.

*सोमवार दि. ३ ऑक्टोबर २०२२ रोजी मुलींचा भोंडला व मंगळवार दि ४ ऑक्टोबर २०२२ रोजी महिला पालकांचा भोंडला साजरा करण्यात आला. या दिवशी श्री व सौ म्हस्के यांच्या हस्ते सरस्वती मूर्तीची पूजा करण्यात आली.

*बुधवार दि ५ ऑक्टोबर २०२२ रोजी विजयादशमी निमित्त विदयार्थ्यांनी 'पाटीपूजन 'केले.

*सोमवार दि.१० ऑक्टोबर ते २०२२ मंगळवार दि.१८ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत प्रथम सत्रांत परीक्षा तोंडी व लेखी स्वरूपात घेण्यात आली.

*बुधवार दि .१९ ऑक्टोबर २०२२ रोजी फटाक्यांचा आतषबाजी दिवाळी सण साजरा करण्यात आला तसेच सर्व विदयार्थ्यांनी किल्ला रांगोळ्या आकाश कंदील आणि फराळाचा आनंद लुटला.

*सोमवार दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी नर्सरी व छोटा शिशुच्या विदयार्थ्यांसाठी बालदिन साजरा झाला.

*सोमवार दि. १४ नोव्हेंबर रोजी कै. सी.एम .पुराणिक सरांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोठा शिशु ते इयत्ता दहावी पर्यंतच्या विदयार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली सदर स्पर्धेचे उद्घाटन मा. श्री रविंद्र कृष्णाजी तामरस (ज.ए.इ. दादरचे कोषाध्यक्ष) सरांच्या हस्ते करण्यात आले या स्पर्धेच्या पारितोषिक

वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे मा.श्री गजानन सदू केणे (संचालक मंडळ सदस्य )व कार्यक्रमाचे अध्यक्ष मा .श्री संजय विश्वनाथ कानिटकर (संचालक मंडळ सदस्य व पूर्व प्राथमिक शालेय समिती अध्यक्ष ) मा.श्री प्रसाद वासुदेव सरदेसाई सर ( संचालक मंडळ सदस्य व इंग्रजी माध्यमाचे कार्यकारी प्रमुख ) यांचा शुभहस्ते स्पर्धेतील विजयी विद्यार्थी १ कु. पाटील प्रथमेश प्रशांत (मोठा शिशु ३) २ कु.खोडदे उर्मी संजय (मोठा शिशु २) उपविजयी विद्यार्थी १ कु.सकपाळ प्रतीक प्रशांत (मोठा शिशु १) २ कु.घाणेकर मनाली चेतन (मोठा गट ४) पारितोषिक प्राप्त विदयार्थ्यांना मेडल व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले.

*२२ऑगस्ट २०२२ रोजी घेण्यात आलेल्या 'रंगोत्सव सेलिब्रेशन' आयोजित रंगभरण स्पर्धेत छोटा शिशु व मोठा शिशु वर्गातील एकूण ३६ विदयार्थी विजयी झाले.बक्षीसपात्र विदयार्थ्यांना मेडल व प्रशास्तीपत्रक देण्यात आले. मा .मुख्याध्यापिका सौ.नीलिमा नरेश भाभे यांना कृतिशील प्राध्यापक पुरस्कार तसेच सहाय्यक शिक्षिका सौ .अपर्णा प्र.पुराणिक व सौ प्रियांका रा. मराठे यांना कलाजीवी पुरस्कार देण्यात आला.

*एल आय सी तर्फे पूर्व प्राथमिक विभागासाठी दोन नवीन मोठे फळे शाळेला भेट म्हणून देण्यात आले आहे.

*शनिवार दि २९ फेब्रुवारी २०20 रोजी ज्येष्ठ शिक्षिका सोनार जयश्री अशोक या सरकारी नियमानुसार सेवानिवृत्त झाल्या.

*शाळेतील माजी विद्यार्थी कुमारी सलोनी संत यांनी शाळेला २१,००० /-रुपये देणगी दिली.

*शैक्षणिक वर्ष २०२०-२१ रोजी श्री विजय् श्रीधर कामेरकर पुरस्कृत कै. सौ.सुरेखा श्रीधर कामेरकर आदर्श शिक्षक पुरस्कार पूर्व प्राथमिक विभागातील श्रीम. वैशाली विवेकानंद देवळे यांना संस्थेकडून प्रदान करण्यात आला.

*शाळेला पालकांचे नेहमीच सहकार्य लाभते त्याबद्दल सर्व पालकांना शाळेतर्फे मनःपूर्वक धन्यवाद ..!

शाळेवरील प्रेमापोटी काही हितचिंतकांनी संस्थेकडे काही ठेवी ठेवलेल्या आहेत.त्यातूनच लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त घेण्यात येणाऱ्या स्पर्धेतील यशस्वी विदयार्थ्यांना पारितोषिके देण्यात येतात.असे आमचे विदयार्थी अनेक क्षेत्रात प्रगती करून यशस्वी होऊन शाळेचा उत्कर्ष वाढवतात.

**अशाप्रकारे आपल्या विशाल वटवृक्षाला समृद्धी व यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था व शिक्षक, पालक सतत प्रयत्न करीत असतात त्यास यश मिळावे हीच प्रार्थना !**

**धन्यवाद !!!!**

**सौ. नीलिमा नरेश भाभे**
**मुख्याध्यापिका**
**ज ए इ ची सी. एम पुराणिक**
**पुर्व प्राथमिक शाळा, सुभेदार वाडा**
**गांधी चौक, कल्याण (प).**

**संकलन .सौ अपर्णा प्र.पुराणिक व सौ प्रियंका रा मराठे.**